महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. पीआर-३/कृषी संजीवनी/१०८१०/** **दिनांक ०१.०४.२०११**

# वाणिज्य परिपत्रक क्र.१३४

**विषय : कृषी ग्राहकांकडील थकबाकी वरील व्याजात सवलत दंण्यासाठी कृषी संजीवनी योजना-२०११.**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार/पुढाकाराने महावितरण कंपनीने कृषी ग्राहकांकरीता **"कृषी संजीवनी योजना-२०११"** या योजनेला मान्यता दिलेली आहे. सदर योजना शेतीपंपाच्या थकीत वीज देयकातील व्याज व विलंब आकारामध्ये सवलत देण्यासाठी राबविण्यात येणार आहे. ही योजना राज्यातील उच्चदाब, लघुदाब कृषी ग्राहकांसह उपसा जलसिंचन योजनांना लागु राहणार आहे.

**"कृषी संजीवनी योजना-२०११"** ची ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) सदर योजना **"कृषी संजीवनी योजना-२०११"** या नावाने संबोंधली जाऊन दि. ०१/०४/२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीत लागू राहील.

२) सदर योजना थकबाकीदार चालू व कायमचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आलेल्या लघुदाब व उच्चदाब कृषी ग्राहकासह उपसा जलसिंचन योजना ग्राहकांकरीता लागू राहील.

३) या योजनेत सहभागी झालेल्या विज ग्राहकांची ३१ डिसेंबर २०१० अखेरपर्यंत थकीत असलेली संपूर्ण मूळ रक्कम दि. ३०.०६.२०११ पर्यंत किंवा तत्पूर्वी अदा केल्यास त्यावरील संपूर्ण व्याज व विलंब आकाराची रक्कम माफ करण्यात येईल.

**४) कृषी संजीवनी योजना लागू झाल्याच्या तारखेपासुन तीन महिन्याच्या आत, म्हणजेच दि. ३० जून २०११ च्या अखेरीस, मुळ थकबाकीच्या रक्कमेचा १०० टक्के भरणा केल्यास सदर रकमेवरील संपूर्ण व्याज व विलंब आकार माफ करण्यात येईल.**

५) डिसेंबर २०१० अखेरीस असलेल्या थकबाकीच्या रकमेचा व्याज व विलंब आकारासह दि. ०१.०१.२०११ ते ३१.०३.२०११ या कालीवधीत भरणा केलेल्या ग्राहकांना व्याज व विलंब आकाराचा परतावा देण्यात यावा. परंतु अशा ग्राहकांना १ जानेवारी २०११ ते ३१ डिसेंबर २०११ पर्यंतच्या चालू विज देयकाचा (डिसेंबर २०११ अखेरपर्यंत वीज वापराचा) नियमित भरणा करावा लागेल व व्याज व विलंब आकाराचा परतावा योजना संपल्यानंतरच्या पुढील चालू विज देयकात समायोजनाव्दारे करण्यात यावा.

६) जर ग्राहकाने थकबाकीची संपूर्ण रक्कम तीन महिन्यात अदा केली नाही तर संपूर्ण मुळ रक्कमेचा भरणा पुढील सहा महिन्यात म्हणजेच ३० डिसेबर २०११ पूर्वी करु शकेल. या मुळ थकबाकीच्या रकमेवर १ जानेवारी २०११ पासून संपूर्ण रक्कमेचा भरणा करेपर्यंत १२% प्रति वर्ष या दराने व्याज आकारले जाईल. (Reducing Balance)

७) सदर योजनेच्या कालावधीत मध्यंतरी कोणत्याही महिन्यापासून सहभाग घेतलेल्या कृषी ग्राहकांना निश्चित केलेल्या मुळ थकबाकीच्या रकमेचा भरणा १२% व्याजासहीत योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. ३१/१२/२०११ पर्यंत करावा लागेल.

८) ज्या कृषी ग्राहकांने योजनेत सहभाग घेतला नाही अथवा योजनेअंतर्गत ठरविण्यात आलेल्या रकमेचा भरणा (उदा. ३१/१२/२०११ पर्यत) केला नाही अशा कृषी ग्राहकांना या योजनेस पात्र समजण्यात येणार नाही व त्यांना प्रचलित नियमाप्रमाणे व्याज व विलंब आकार लावण्यात येईल व त्यांनी देयकांचा भरणा न केल्यास विद्युत कायदा २००३ नुसार विद्युतपुरवठा खंडीत करण्यात येईल. तसेच थकबाकी वसुलीकरिता नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

९) वरील योजनेच्या कालावधीत कृषी ग्राहकाने नियमित येणा-या १जानेवरी २०११ पासून ३१ डिसेंबर २०११ पर्यंतच्या विज देयकाचा इंधन अधिभारासह संपूर्ण भरणा करणे बंधनकारक राहील. अन्यथा या योजनेच्या लाभास अपात्र ठरविण्यात येईल.

१०) डिसेंबर २०१० अखेरची कृषी ग्राहकांकडील मुळ थकबाकीची रक्कम ही महावितरण कंपनीच्या लेखा पुस्तिकेतील नोंदीप्रमाणे ग्राह्य धरण्यात येईल.

११) सदर योजना यशस्वीपणे राबविण्याकरिता स्थानिक स्तरावर दुरदर्शन तथा वर्तमानपत्रामध्ये व्यापक जाहिराती देण्यात याव्यात.

सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय अधिका-यांनी प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी दयावी. तसेच सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी दवंडी देऊन लाऊड स्पिकरव्दारे तसेच लोकप्रतिनिधीशी संपर्क साधून कृषी संजीवनी योजना २०११ ला प्रसिध्दी दयावी. ग्रामसभा, ग्रामपंचायतीचे सदस्य,

पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे सभासद व स्थानिक लोकप्रतिनिधींना सदर योजना अवगत करुन देण्यात यावी.

सदर योजना प्रयत्नपूर्वक राबविल्यास शेतक-यांवरील थकबाकीचा बोजा कमी होईल व थकबाकीची वसुली सुध्दा होईल. वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल याबाबत क्षेत्रिय अधिका-यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत.

०९/०४/२०११

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना : प्रेक्षण यादीप्रमाणे**